राज्यातील बंद आस्थापना / कंपन्या / कारखाने /
गिरण्या यांच्या जमिनीच्या विकासासाठी
ना-हरकत प्रमाणपत्राबाबत.

महाराष्ट्र शासन,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक:नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/कामगार-२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ३०.१०.२००७

शासन निर्णय:-

राज्यातील ब-याचशा बंद पडलेल्या आस्थापना / कंपन्यांनी / कारखान्यांनी / गिरण्यांनी त्यांच्याकडील कामगारांची कायदेशीर देणी न देताच संबंधित जागेवर जमिनीचा विकास करण्यास सुरुवात केली होती असे आढळून आल्याने व याबाबत वारंवार लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्याने यासंदर्भात शासन स्तरावरील विविध बैठकांमध्ये असा निर्णय घेण्यात आला आहे की, जोपर्यन्त बंद पडलेल्या आस्थापना / कंपन्या /कारखाने / गिरण्यांमधील कामगारांची देणी पूर्णपणे अदा केली जात नाहीत तोपर्यन्त अशा आस्थापना/कंपन्या/कारखाने/गिरण्यांच्या जमिनीवर निवासी/ वाणिज्यिक/ व्यापारी विकासास शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

यास्तव महाराष्ट्र राज्यांमधील बंद कंपन्याच्या / कारखान्यांच्या / गिरण्यांच्या जमिनीचा औद्योगिक वापरातून रहिवास / वाणिज्यिक / व्यापारी वापरासाठी तसेच कंपनीचे कुठल्याही प्रकारचे हस्तांतरण करताना किंवा तसा बदल करताना संबंधित जमिनीवरील कंपनी / कारखान्यांच्या / गिरण्यांच्या, व्यवस्थापनाने / मालकांनी त्यांच्याकडे असलेल्या सर्व कामगारांची कायदेशीर देणी पूर्णपणे अदा केली आहेत असे ना-हरकत प्रमाणपत्र, कामगार आयुक्त, मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचेकडे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करुन शासनाच्या मान्यतेने संबंधित व्यवस्थापनाने/मालकाने प्राप्त करुन घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(चं. रा. गोसावी )
शासनाचे उप सचिव

प्रति-

कामगार आयुक्त,
कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई.

F:\old data d\SALOMI\LAB\LAB 2GR NOC-(P)

ROTA|H-1798(1500-10-2007)1

प्रतः-

१)मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय

२) उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय,

३) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,

४) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई

६) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी

७) सर्व महानगरपालिका आयुक्त

८) सर्व नगर परिषद मुख्याधिकारी

९) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल, नरीमन पॉईट, मुंबई

१०)महानगर आयुक्त, मुंबई, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा.

११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग,अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

१२) अपर कामगार आयुक्त, मुंबई / पुणे / नागपूर

१३) उप कामगार आयुक्त, मुंबई / ठाणे / नाशिक / औरंगाबाद

१४) अवर सचिव, नगर विकास विभाग (११/१३/३०), मंत्रालय, मुंबई.

१५) कक्ष अधिकारी, नवि-९/१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

H-1793-1a